229

सौ. अनिता बाळासाहेब जाधव,प्राथमिक शिक्षिका
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणोरे,ता.अकोले
यांचे जिल्हा परिषद सेवेतील निलंबन
कालावधीबाबत

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथ.)
जावक क्रमांक वशि/खाचौ/1283/2018
अहमदनगर, दिनांक - 15/12 /2018

संदर्भ - 1) गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्रं. अस्था-2/383/2015 दिनांक 16/04/2015
2) या कार्यालयाकडील दोषारोप क्रमांक कार्या3/डिई/463/2015,अहमदनगर दिनांक 22/06/2015
3) गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्रमांक आस्था-2/745/2015, दिनांक 10/08/2015 अन्वये सादर केलेला श्रीमती जाधव यांचा दिनांक 05/08/2015 चा खुलासा
4) या कार्यालयाकडील आदेश क्रमांक कार्या2/डिई/708/14, अहमदनगर, दिनांक 14/09/2015
5) सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्रमांक विशा4/खाचौ/सीआर/256/2015, दिनांक 10/05/2016
6) या कार्यालयाकडील अंतिम शिक्षा आदेश क्रमांक कार्या2/खातेचौकशी/446/2016 दिनांक 13/07/2016
7) या कार्यालयाकडील निलंबन कालावधी नोटीस क्रमांक वशि/खाचौ/1023/2018 अहमदनगर, दिनांक 29/08/2018
8) सौ.अनिता बाळासाहेब जाधव यांचा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती अकोले यांचे मार्फत खुलासा पत्र क्रमांक आस्था-1104/2018, दिनांक 01/10/2018
9) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी ...) नियम 1981 चे नियम 72(3)

गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्रमांक अस्था-2/383/2018, दिनांक 16/04/2015 चे पत्रानुसार आपण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळेगांव दिघे, ता.संगमनेर येथे कार्यरत असतांना आपल्या विरुध्द असलेल्या शालेय गैरवर्तनाबाबत या कार्यालयाकडील निलंबन आदेश क्रमांक कार्या1/पीबीएस/310/2015, दिनांक 26/02/2015 अन्वये आपणांस जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबित करण्यात आलेले आहे.

या कार्यालयाकडील दोषोरोप ज्ञापन क्रमांक कार्या3/डिई/463/2015, दिनांक 22/06/2015 अन्वये आपणांस दोषारोप ज्ञापन बजाविणेत आलेले आहेत.

गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्रमांक आस्था-2/745/2015, दिनांक 10/08/20158 अन्वये आपण दोषारोप ज्ञापन खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलाश्यामध्ये आपण सर्व दोषारोप नाकारल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे नियम 6 नुसार न्याय व

हक्काचे दृष्टीने खाते निहाय चौकशी करण्यासाठी मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक, यांची या कार्यालयाकडील आदेश क्रमांक कार्या2/डिई/708/14,दिनांक 14/09/2015 अन्वये विभागीय चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करणेत आलेली होती.

या कार्यालयाकडील आदेश क्रमांक कार्या2/खातेचौकशी/613/2015, दिनांक 11/09/2015 अन्वये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणोरे, ता.अकोले येथे आपणांस पुन:स्थापीत करण्यांत आलेले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणोरे, ता.अकोले येथे आपण दिनांक 18/09/2015 रोजी हजर झालेले आहात.

सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक, यांनी विभागीय चौकशी अहवाल क्रमांक विशा4/खाचौ/सार /256/2015, दिनांक 10/05/2016 अन्वये विभागीय चौकशी अहवाल इकडील कार्यालयांस सादर केलेला आहे. सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांनी आपल्यावर ठेवण्यांत आलेल्या दोषारोप ज्ञापनातील दोन दोषारोपां पैकी दोनही दोषारोप सिध्द झालेले नसल्याचा निष्कर्ष नोंदविलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयाकडील आदेश क्रमांक कार्या2/खातेचौकशी/446/2016, दिनांक 13/07/2016 अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे भाग 3 नुसार सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांनी सदर केलेल्या चौकशी अहवालास सहमती दर्शविणेत येऊन आपणांस दोषारोप ज्ञापनातील सर्व दोषारोपांतुन दोषमुक्त करण्यांत आलेले आहे.

आपण कु. विक्रम अरुण सानप या विद्यार्थ्याला दिनांक 18/02/2015 रोजी शाळेच्या बेंचवर शाई सांडली असल्याचे कारणाने मारहाण केलेली आहे तसेच आपण स्वत:चे अधिकारात कार्यालयास कुठल्याही प्रकारची पुर्वसुचना न देता, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब न करता अनाधिकृत गैरहजर राहिलेला आहात. आपला दिनांक 26/02/2015 ते 17/09/2015 अखरेचा 6 महिने 23 दिवसांचा सेवा निलंबन कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी ...) नियम 1981 चे नियम 72(3) नुसार सेवेच्या सर्व कारणांकरीता (सेवा निवृत्ती लाभासह) सेवा निलंबन कालावधी म्हणून का धरण्यांत येऊ नये ? याबाबतचे आपले अभिवेदन ही नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांत या कार्यालयांस सादर करावे. आपले अभिवेदन मुदतीत प्राप्त न झाल्यांस या संदर्भात आपले काही म्हणणे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावीत कारवाई करण्यांत येईल याची नोंद घ्यावी. याबाबत या कार्यालयकडील निलंबन कालावधी नोटीस क्रमांक वशि/खाचौ/1023/2018, दिनांक 29/08/2018 अन्वये आपणांस बजाविणेत आलेली होती. त्यास आपण गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती अकोले यांचेकडील पत्र क्रमांक आस्था/1013/2018, दिनांक 10/09/2018 अन्वये खुलासा सादर केलेला आहे. आपणांस या कार्यालयाकडील आदेश क्रमांक कार्या2/खातेचौकशी/446/2016 दिनांक 13/07/2016 अन्वये दोषारोप ज्ञापनातुन दोषामुक्त केलेले असल्यामुळे आपण सादर केलेला खुलासा समाधानकारक व वस्तुस्थित दर्शक असल्याने मान्य करणेत येत आहे.

सौ. अनिता बाळासाहेब जाधव, प्राथमिक शिक्षिका, यांचा दिनांक 26/02/2015 ते 17/09/2015 अखेरचा 6 महिने 23 दिवसांचा निलंबन कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी..) नियम 1981 चे नियम 72 (3) नुसार सेवेच्या सर्व कारणांकरीता सेवा कालावधी म्हणून नियमित करणेत येत आहे. सदर आदेशाची नोंद सौ. अनिता बाळासाहेब जाधव, प्राथमिक शिक्षिका यांच्या मुळ सेवा पुस्तकांमध्ये घेण्यांत यावी.

231

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आलेला असून त्यांचा संकेतांक क्रमांक 201812151260400 असा आहे.

(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

सौ. अनिता बाळासाहेब जाधव, प्राथमिक शिक्षिका
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणोरे,ता.अकोले
द्वारा - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती अकोले
2/- श्रीमती अनिता बाळासाहेब जाधव, प्राथमिक शिक्षिका यांना सेवा कालावधी आदेश पोहोच करुन दिनांकित स्वाक्षरीसह पोहोच इकडील कार्यालयांस सादर करणेची दक्षता घेणेत यावी.

(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर